**५.३ निविदा शुल्क :-**

सर्व निविदा online प्रसिध्द करण्यात येत असल्याने निविदा शुल्क खालीलप्रमाणे आकारण्यात यावी.

| अ.क्र. | निविदा रक्कम | निविदा शुल्क |
|---|---|---|
| १ | रु. ३.०० लक्ष पर्यंत | रु.२०० + वस्तु व सेवा कर |
| २ | रु. ३ ते रु.५० लक्ष पर्यंत | रु.५०० + वस्तु व सेवा कर |
| ३ | रु. ५० लक्ष ते रु.२ कोटी पर्यंत | रु.१००० + वस्तु व सेवा कर |
| ४ | रु. २ कोटी ते रु.५ कोटी पर्यंत | रु.२००० + वस्तु व सेवा कर |
| ५ | रु. ५ कोटी ते रु.१०० कोटी पर्यंत | रु.३००० + वस्तु व सेवा कर |
| ६ | रु. १०० कोटी ते रु.५०० कोटी पर्यंत | रु.५००० + वस्तु व सेवा कर |
| ७ | रु. ५०० कोटी पेक्षा जास्त | रु.१०००० + वस्तु व सेवा कर |

**५.४ वस्तु व सेवा कर (GST):-**

१) **वस्तु व सेवा करासंबंधी कंत्राटदारांनी त्यापृष्ठयर्थ परिपूर्ण कागदपत्रे सादर केल्यानंतर कार्यकारी अभियंता यांनी** VAT/Excise **या बाबी आवश्यकतेनूसार वगळून देयकांची छाननी करुन** ३० **दिवसांमध्ये संबंधीत देयके कंत्राटदारास अदा करावीत.**

२) **राज्य दरसुचीमधील विविध बाबीचे दर हे वस्तू व सेवा कर वगळून असावेत. अंदाजपत्रके तयार करताना प्रचलित वस्तु व सेवा कर** Recupulation Sheet **मध्ये अंतर्भुत करावा.**

३) **कामांच्या निविदा वस्तु व सेवा कर वगळून अंदाजपत्रकाच्या किंमतीवर आधारित मागविण्यात याव्यात.**

**५.५ यंत्रसामुग्री:-**

१) **यंत्रसामुग्रीसाठी स्वत:च्या मालकीच्या जागेची अट टाकण्यात येऊ नये.**

२) **कामांसाठी नवीन यंत्रसामुग्रीचे आयुर्मान** १५ **वर्षे गृहीत धरण्यात यावे.**

३) **पहिल्या १० वर्षाकरीता अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) यांच्या योग्यता प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.**

४) **१० वर्षानंतर प्रतिवर्षी अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) यांचे योग्यता प्रमाणपत्र आवश्यक राहील.**

५) **रु.१.५० कोटी रकमेच्या कामांसाठी तसेच सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांच्या कामांसाठी** Hot Mix Plant/Batch Mix Plant/Machinery **यांच्या मालकी हक्काबाबतची अट निविदेमध्ये समाविष्ट करण्यात येऊ नये. यासाठी स्वसाक्षांकित भाडे प्रमाणपत्राची अट टाकण्यात यावी.**

**६.** या शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभागाची नियम पुस्तिका सहावी आवृत्ती १९८४ आणि यापूर्वी निविदा विषयक निर्गमित करण्यात आलेल विविध शासन निर्णय/परिपत्रके हे अधिक्रमित करण्यात येत आहेत. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम नियम





तकेतील संहितेमध्ये विहित कलमे यथावकाश सुधारित करुन प्रसिद्ध करण्यात येतील. या तीतील निविदा विषयक अन्य शासन निर्णय/परिपत्रके यातील आदेश यामुळे आपोआपच रद्द